बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

आज़ादी का अमृत महोत्सव

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रने अतिरिक्त श्रेणी १ ( एटी १ ) बॉण्ड द्वारे रु ७१० कोटी उभारले – निर्धारित उद्दिष्टापेक्षा दहापट अधिभरण

**पुणे दिनांक ७ सप्टेंबर २०२२** : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आज बुधवार रोजी ८.७४% कुपन दराने बेसिल ३ अनुपालनशील अतिरिक्त श्रेणी १ ( ए टी १ ) बॉण्ड द्वारे ( रु ६१० कोटी च्या ग्रीन शु पर्यायासह ) रु ७१० कोटी उभारले. या इश्यूला गुंतवणूकदारांनी जबरदस्त प्रतिसाद देऊन रु १०० कोटीच्या निर्धारित उद्दिष्टापेक्षा दहापट अधिभरण केले आहे. अतिरिक्त श्रेणी १ ( ए टी १ ) बॉण्ड देकार खुला झाल्यावर फक्त १५ मिनिटातच अपेक्षित रक्कम संकलित झाली.

अतिरिक्त श्रेणी १ ( ए टी १ ) बोण्ड्स द्वारे उभारलेल्या रु ७१० कोटीच्या भांडवली रकमेमुळे बँकेच्या व्यवसायवाढीला पाठबळ मिळेल.सदर अतिरिक्त श्रेणी १ ( ए टी १ ) बॉण्ड हे कायम स्वरूपी असून ५ वर्षांच्या कालावधी नंतर ते पुनर्विमोचन करता येतील .

बँकेचे अतिरिक्त श्रेणी १ ( ए टी १ ) बॉण्डसाठी AA ( स्टेबल ) असे पत मानांकन आहे.